# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 08 May 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०८ मे २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात प्रचाराचे अवघे तीन दिवस शिल्लक–सभा आणि पदयात्रांना वेग
- भाजप नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची आज जालन्यात सभा तर श्रीगोंद्यात शरद पवार यांचा मतदारांशी संवाद
- विधान परिषदेच्या चार जागांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर–१० जूनला मतदान

आणि

- छत्रपती संभाजीनगर तसंच धाराशिव नामांतराविरोधातल्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्या–मुख्यमंत्र्यांकडून निर्णयाचं स्वागत

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात प्रचाराचे अवघे तीन दिवस राहिले असल्यानं, प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक सभा, बैठका, रोड शो, पदयात्रा आदींच्या माध्यमातून आपल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. चौथ्या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज जालना इथं महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ सभा घेणार आहेत. शहरातल्या डॉ. फ्रेजर बॉय हायस्कूल मैदानात आज संध्याकाळी ही सभा होत आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नेहमीच किंगमेकरच्या भूमिकेत राहिले. त्यांच्यासमोर मुख्यमंत्रीपद नगण्य असल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. आज नाशिक इथं, विजय करंजकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला, त्यांचं स्वागत केल्यानंतर मुख्यमंत्री पत्रकारांशी बोलत होते. बाळासाहेबांचे वारस असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या मनात मात्र अनेक वर्षांपासून मुख्यमंत्रीपदाची सुप्त इच्छा होती, अशी टीकाही शिंदे यांनी यावेळी केली.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्रातील मोदी सरकारचे धोरण शेतकरी हिताचे नसल्याची टीका केली आहे. अहमदनगरचे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ श्रीगोंदा इथं प्रचार सभेत पवार बोलत होते. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार संजय राऊत, आमदार रोहित पवार माजी आमदार राहुल जगताप उपस्थित होते.

दरम्यान, बीड मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची उद्या गुरुवारी संध्याकाळी अंबाजोगाई इथं सभा होणार आहे.

****

भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर इथं महायुतीच्या उमेदवार डॉ. हिना गावित यांच्या प्रचारार्थ मेळावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात देशातील सर्वच घटकांसाठी कल्याणकारी योजना राबवल्या जात असून 'सबका साथ, सबका विकास' साधला जात आहे, असं फडणवीस म्हणाले. विरोधकांकडे मुद्देच उरलेले नाहीत, त्यामुळे त्यांनी संविधान बदलण्यासंदर्भातला खोटा प्रचार सुरु केल्याची टीका फडणवीस यांनी केली.

****

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज धुळे इथं वार्ताहर परिषद घेत, केंद्र सरकारवर टीका केली. मोदी सरकारने महागाई वाढवली, नोकरशाही या सरकारला वैतागली असल्याचं, पटोले यांनी म्हटल्याचं वृत्त आहे.

****

विधान परिषदेच्या जुलै महिन्यात रिक्त होणाऱ्या ४ जागांच्या निवडणुकीबाबतच वेळापत्रक आज निवडणूक आयोगाने जारी केलं. या चार जागांमधे मुंबई आणि कोकण विभागातील पदवीधर तसंच मुंबई आणि नाशिक विभागातील शिक्षक

मतदार संघाचा समावेश आहे. मुंबई पदवीधर मतदार संघाचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदार संघाचे निरंजन डावखरे, मुंबई आणि नाशिक शिक्षक मतदार संघाचे अनुक्रमे किशोर दराडे आणि कपिल पाटील हे सदस्य येत्या ७ जुलै रोजी निवृत्त होत आहेत. या निवडणुकीसाठी १५ मे पासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून, २२ मे ही अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असणार आहे. २४ मे रोजी अर्जांची छाननी होईल तर २७ मे रोजी उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहे. १० जून रोजी मतदान होणार असून, १३ जून रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण नाशिक आणि दिंडोरी या दोन लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याच्या अनुक्रमे छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव अशा नामांतराच्या शासनाच्या निर्णयावरोधात दाखल केलेल्या याचिका आज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाचं स्वागत करत, उच्च न्यायालयाचे अभार व्यक्त केले आहेत. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झालं असून, संभाजीनगर हे नाव सर्वप्रथम बाळासाहेब ठाकरे यांनीच दिलं होत, याकडे शिंदे यांनी लक्ष वेधलं. हा जनभावनेचा विजय असल्याचं शिंदे यांनी नमूद केलं. मात्र या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणारे याचिकाकर्ते महाविकास आघाडीचे समर्थक असून, महाविकास आघाडीचा खरा चेहरा समोर आल्याचा आरोपही शिंदे यांनी केला.

****

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव इथल्या एका खासगी शेती पीक उत्पादक कंपनीच्या अधिकाऱ्याने ११ शेतकऱ्यांचा २३२ क्विंटल हरभरा परस्पर विक्री करत १३ लाखांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. सुरज प्रताप मोरे असं या अधिकाऱ्याचं नाव असून १६ मे ते ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत कंपनीमार्फत शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी केला होता, या कंपनीकडे नाफेडचे खरेदी केंद्र आहे. मात्र कंपनीने खरेदी केलेला हरभरा नाफेडकडे पोहोचवण्याऐवजी मोरे याने त्याची परस्पर विक्री केल्याचा प्रकार समोर आल्यावर ही कारवाई करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धुळे लोकसभा मतदार संघाचे सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक पूर्ण चंद्र किशन यांनी आज धुळे जिल्ह्यातल्या मालेगाव मध्य, बाह्य आणि बागलाण या तीन विधानसभा मतदार संघाचा आढावा घेतला. जास्त मतदान केंद्र असणाऱ्या ठिकाणी मतदारास सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, मतदानाच्या दिवसापूर्वी शेवटच्या ७२ आणि ४८ तासात करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना किशन यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

****

निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना मतदान करता यावं यासाठी अहमदनगर जिल्ह्यातल्या शिर्डी लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघातल्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात, मतदार सुलभता केंद्राची स्थापना करण्यात आली आहे, या मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी ही माहिती दिली आहे. हे मतदान सुलभता केंद्र ९ मे आणि १० मे रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहे.

****

बीड लोकसभा मतदार संघातल्या निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचं उद्या ९ मे पासून १२ मे पर्यंत टपाली मतदान घेण्यात येणार आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, कविता जाधव यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, बीड लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी मतदान होणार असून घरोघरी मतदार चिठ्ठी वाटपाची कार्यवाही सुरू झालेली आहे. या अंतर्गत आज यादी भाग क्रमांक १९४ चे बी. एल. ओ. विलास वामन वीर आणि बीड तहसील कार्यालयातील कर्मचारी अनिल विद्यागर यांनी बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ– मुंडे यांना त्यांच्या घरी जाऊन मतदार माहिती चिठ्ठी सुपूर्द केली.

****

नंदुरबारमध्ये आजपासून ८५ वर्षावरील तसंच दिव्यांग नागरिकांच्या गृह मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. यासाठी २६९ दिव्यांग आणि ८५ वर्षावरील एक हजार १५४ नागरीकांनी नोंदणी केली आहे.

****

नांदेड इथल्या महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या अनुसया शासकीय महिला वसतिगृह ही संस्था अनाथ, निराधार, निराश्रीत आणि अडचणीतल्या महिलांसाठी कार्यरत आहे. वय वर्ष १८ वर्षांपुढील गरजू महिलांना तसच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी होण्यासाठी पुनर्वसनाच्या दृष्टीने संस्थेत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. गरजू महिलांनी संस्थेचा लाभ घ्यावा, असं आवाहन शासकीय महिला राज्यगृहच्या अधीक्षक एस. एम. पुजलवार यांनी केले आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या वैजापूर तालुक्यात कमी पाऊस पडल्यामुळे अनेक गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातल्या धरणातून पिण्यासाठी पाणी सोडण्यात यावं, तसंच जनावरांना देखील पाणी, चारा उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी वैजापूर पंचायत समितीचे उपसभापती मनसुख झांबड यांनी केली आहे. या मागणीबाबत त्यांनी नुकतच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिलं आहे. तालुक्यातल्या शेतकऱ्यांना खरिप हंगामातला उर्वरित पीकविमा तसंच रब्बी हंगामातला पीकविमा लवकर देण्यात यावा असंही या निवेदनात म्हटलं आहे.

****

नांदेड इथून सुटणारी नांदेड अमृतसर सचखंड एक्सप्रेस आज तिची नियोजित वेळ सकाळी साडेनऊ ऐवजी सायंकाळी पाच वाजता सुटली आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं ही माहिती दिली आहे.

****

इंडियन प्रिमियर लीग – आय पी एल क्रिकेट स्पर्धेमध्ये आज सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंटस् यांच्यात सामना होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजेपासून हा सामना खेळवला जाणार आहे.

****